**नि.क्र.सी–9**

**तक्रार (युएलपी) क्र.20 / २०१९**

**उलटतपास — विधीज्ञ श्रीमती व्ही.आर.माळी, तक्रारदारतर्फे**

३. मी कामगार अधिकारी म्हणून जाबदार महामंडळात कार्यरत आहे. माझेकडे सध्या कर्मचारी वर्ग अधिकारी पदाचा कार्यभार आहे. मला कर्मचा–यास नेमणूक व सेवेतून कमी करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. माझ्या सहीने आरोपपत्र दिले जाते. या प्रकरणी मला साक्ष देण्याकरिता लेखी अधिकार देण्यात आलेले नाहीत. या प्रकरणी कोणतेही लेखी आदेश माझ्या सहीने निघालेले नाहीत. कामगार अधिकारी म्हणून कार्यरत असलेलेन कामगार संदर्भात निघत असलेली परिपत्रके, करार याबाबतची माहिती मला असते.

४. यातील तक्रारदार हा रा.प.महामंडळाकडे चालक म्हणून कार्यरत होता. तक्रारदार हे चालक पदी कार्यरत असताना रंगांधळेपणामुळे चालक पदाच्या नोकरीस अपात्र ठरविण्यात आले होते. ती अपात्रता वैद्यकीय दाखल्यानुसार ठरविण्यात आली. तक्रारदाराची वैद्यकीय तपासणी रा.प.महामंडळाच्या आदेश व सूचनेनुसार झाली होती. हे म्हणणे खरे आहे की एखादा कर्मचारी काम करीत असलेल्या पदी अपात्र ठरल्यास त्यास पर्यायी पदी वर्गीकृत करणे आवश्यक असते. आता मला नि.क्र.यु–४/३ वरील आदेश दाखविला. तो वि.आ.आ क्र ३५/२०१४ दि. २३/०१/२०१४ चा आदेश असून त्यानुसार तक्रारदाराला सुरक्षारक्षक पदी पर्यायी नोकरी देण्यात आली. त्यास **नि.क्र.यु–२८** देण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की तक्रारदाराची सुरक्षारक्षक पदी नेमणूक करताना अटी व शर्थी तपासून त्यांना रुजू करुन घेण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की सन २०१४ पासून तक्रारदार हे सुरक्षारक्षक पदी कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की दि. २९/०७/२०१६ च्या परिपत्रकानुसार तक्रारदाराला पुनश्च: वैद्यकीय चाचणी करण्याचे आदेश देण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की दि.२०/०७/२०१६ चे परिपत्रक हे नंतरच्या

दि.२३/०१/२०२० च्या परिपत्रक क्र.४/२०२० नुसार रद्द करण्यात आले आहे. ते आता मला दाखविले असून ते तेच आहे. त्यास **<u>नि.क्र.यु–२९</u>** देण्यात आला. हे मला माहित नाही की सदर २०२० चे परिपत्रक हे मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.९७६२/२०१९ च्या कामी दिलेल्या निर्देशानुसार काढण्यात आले आहे.

५. रिट पिटीशन क्र.९७६२/२०१९ मधील दि.१३/०७/२०२० च्या निर्देशानुसार तक्रारदाराविरुध्द काही कारवाई करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की सन २०१६ चे परिपत्रक रद्द झाले असलेने तक्रारदाराला वैद्यकीय चाचणीला पाठविण्याचे कोणतेही कारण नव्हते. हे म्हणणे खरे आहे की तक्रारदाराला कमी केल्यानंतर पुर्न:नेमणूक दिलेल्या मधल्या काळातील पगार तक्रारदाराला देण्यात आलेला नाही. तो कालावधी परिपत्रकानुसार असाधारण बिनपगारी रजा म्हणून गणण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सन २०१६ चे परिपत्रक अस्तित्वात आले त्यावेळी तक्रारदाराचा पर्यायी नेमणूकीबाबतचा विषय प्रलंबित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की सन २०१६ चे परिपत्रक यातील तक्रारदाराला त्यावेळी लागू होत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार वैद्यकीय चाचणीतून रंगांधळेपणाकरिता अपात्र झाल्यानंतर त्याला पर्यायी नोकरी दिल्यावर त्याच कारणासाठी पुन्हा वैद्यकीय चाचणी करण्याचे काही कारण उरत नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की तक्रारदार २०१२ मध्ये अपात्र झाला त्यावेळी ॲनामॉलस स्कोपिक चाचणीचा उल्लेख कोणत्याही परिपत्रकात नव्हता. हे म्हणणे खरे आहे की तत्कालीन परिस्थितीत अस्तित्वात असलेल्या परिपत्रकातील अटी व शर्थीनुसार तक्रारदार सेवेतून अपात्र झालेला होता.

७. हे म्हणणे खरे नाही की दि.२३/०१/२०२० च्या परिपत्रकातील अटी व शर्थी मला माहित नाहीत. हे म्हणणे खरे आहे की आजरोजी तक्रारदाराचे पर्यायी नोकरी मागण्याचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. हे म्हणणे खरे आहे की मी माझे सरतपासातील प्यारा–२ मध्ये केलेले कथन सन २०१६ च्या परिपत्रकावर विसंबून

केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की सन २०१६ चे परिपत्रक तक्रारदारास लागू होत नाही. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदारास रंगांधळेपणाकरिता पुनश्च: वैद्यकीय चाचणी करण्याचे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण झाला.</u>

<u>फेरतपास काही नाही.</u>

सांगली.

(रा.व. उत्पात)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सांगली

दिनांक – ०४.१०.२०२५